Include

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
१ ला मजला, लिली अपार्टमेंट
पारसी अग्यारी लेन, टेंभी नाका,
ठाणे (पश्चिम),पिन नं. ४०० ६०१,
दिनांक : 15/2/2022

# चौकशीची जाहीर नोटीस

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था **मिरा भाईंदर महानगरपालिका वार्ताहर संघ, नों.क्र.F-११३९४ (ठाणे)** स्वयंखुद्द चौकशी अर्ज क्र.०३/२०२१

मध्ये सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर न्यासाचे या कार्यालयातील अभिलेखा तपासले असता या न्यासाने नोंदणी झालेपासून न्यासाची हिशोबपत्रके दाखल केली नाहीत. तसेच न्यासात होणारे बदल सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदर न्यास निष्क्रीय असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे सदरच्या न्यासाची नोंदणी रद्द करणेबाबतची चौकशी सुरु केली आहे.

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यायची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियत म्हणणेचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत म्हणणे न आलेस कोणास काही सांगायचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व योग्य ते आदेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्यानिशी आज दि.१५.०२.२०२२ रोजी दिली.

धर्मादाय उप आयुक्त ठाणे विभाग, ठाणे

15.2.22

ठिकाण : ठाणे
दिनांक : 15/2/22

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे